**नियमित फौजदारी केस नं. ७०/२०२५**
**नि. क्र. १२**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – प्रितम आत्माराम बांडागळे

**वय**– ४६ वर्षे, **व्यवसाय** – शेती, **राहणार** – मुरादपुर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून–</u>**

**०१**. दिनांक २३/०४/२०२५ रोजी मी माझ्या घरी हजर होतो. त्यावेळी पोलीसांनी मला देवरुख, मार्लेश्वर रोडवर असताना त्यांनी मला बोलावले होते. पोलीसांनी माझे एक छायाचित्र घेतले होते. माझ्यासोबत आणखी ०३ जन होते. पोलीसांनी आणखी तेथे काही केले नाही.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

**०२**. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला निलेश रमेश बांडागळे यांच्या घरासमोरील रस्त्यावर बोलावले होते. हे मला माहिती नाही की, त्याठिकाणी आदल्या दिवशी अपघात झाला होता, अगर कसे. मी आत्माराम भागोजी गोंधळी यांना ओळखतो. हे मला माहिती नाही की, ते सदर अपघातामध्ये मयत झाले होते, अगर कसे. साक्षीदार पुढे सांगतो की, ते मयत झाल्याचे मला माहिती आहे. मी मुरलीधर श्रीधर खेडेकर यांना ओळखतो.

**०३**. हे मला माहिती नाही की, मुरलीधर खेडेकर यांच्याकडे एमएच–०९–डीपी–७००२ ही मोटारसायकल वाहन आहे, अगर कसे. हे मला माहिती नाही की, आत्माराम गोंधळी हे सदर रस्त्यावरुन पायी चालत जात असताना मुरलीधर खेडेकर याने त्याच्या वर नमुद मोटारसायकलीने धडक देवुन अपघात केला होता व त्यामध्ये

आत्माराम मयत झाले होते, अगर कसे. हे मला माहिती नाही की, आत्माराम यांना सी.पी.आर., हॉस्पीटल, कोल्हापुर येथे नेण्यात आले होते. साक्षीदार पुढे सांगतो की, त्यांन फक्त कोल्हापुर येथे नेल्याचे मला माहिती आहे. हे मला माहिती नाही की, कोल्हापुर येथे उपचार चालु असताना आत्माराम मयत झाले, अगर कसे.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, छायाचित्रे घेतेवेळी माझ्यासोबत दोन महिला हजर होत्या. हे मला माहिती नाही की, पुर्वा ढोके यांनी सदरचे घटनास्थळ दाखविले होते, अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, छायाचित्र घेतेवेळी माझ्यासोबत पर्शुराम चोगले हे देखील हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, मला व पर्शुराम चोगले यांना पोलीसांनी पंचनाम्यासाठी पंच म्हणुन हजर रहा, असे सांगुन बोलावले होते.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, देवरुख–मार्लेश्वर हा डांबरी रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे एमएच–०९–डीपी–७००२ ही मोटारसायकल घासत गेल्याच्या खुणा दिसत होत्या व सदर अपघात ठिकाणी मोटारसायकलचे फायबरचे तुकडे पडलेले दिसत होते. हे म्हणणे खरे नाही की, रस्त्यावर रक्ताचे डाग पडलेले होते. हे मला माहिती नाही की, सदर ठिकाणापासुन ३० फुट अंतरावर रस्त्याच्या कडेला एक चप्पल पडलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, तेथे मार्लेश्वर–देवरुख हा पुर्व–पश्चिम रस्ता असुन घटनास्थळाच्या दक्षिणेस १०० फूट अंतरावर निलेश बांडागळे यांचे घर व त्यापुढे ऋतुराज बांडागळे यांचे राहते घर आहे व त्यापुढे पडीक जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे उत्तरेला रामचंद्र चोगले यांची काजुची बाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तेथे पंचनामा ०४:१५ ते ०५:१५ च्या दरम्यान पुर्ण केला होता. हे मला माहिती नाही की, पोलीसांनी तेथे घटनास्थळाचा नकाशा रेखाटला होता, अगर कसे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा झाल्यावर पोलीसांनी माझी व पर्शुराम चोरगे यांचे सही घेतली होती.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर पोलीसांनी आम्हाला पोलीस ठाण्यात बोलावले होते व त्यावेळी चंद्रकांत कामेरकर हे देखील माझ्यासोबत हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी अपघातग्रस्त वाहन एमएच–०९–डीपी–७००२ ही आरोपीने हजर केली असुन ती जप्त करावयाची असल्याने जप्ती पंचनाम्याकरीता हजर रहा, असे आम्हाला कळविले होते. हे मला माहिती नाही की, तेथे सदरची मोटारसायकल उत्तरेस तोंड करुन उभी केली होती, तिचा पुढील प्लॅस्टीक वॉयसर तुटलेला, हेड लाईट तुटलेली, मडगार्ड घासलेले, हॅण्डलची मुठ घासलेली, पुढील ब्रेक दांडे घासलेले, सायलेन्सर घासलेला, उजव्या बाजुकडील पुढील फूटरेस्ट बेंड झालेली व पुढील साईड इंडीकेटर घासलेली अशा अवस्थेत होते.

**०७.** पोलीसांनी देवरुख पोलीस ठाण्याच्या आवारात छायाचित्रे घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, ०६:०० ते ०७:०० वाजताच्या सुमारास सदर वाहनाचा जप्ती पंचनामा केला. सदरची गाडी आज रोजी मला दाखविल्यास मी ओळखु शकणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्यानंतर माझी, चंद्रकांत कामेरकर व आरोपीची पंचनाम्यावर सही घेतली होती. साक्षीदार पुढे सांगतो की, पोलीसांनी माझी दुसऱ्या दिवशी दोन–तीन सहया घेतल्या होत्या. *(साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा व वाहन जप्ती पंचनामा दाखविण्यात आला). घटनास्थळ पंचनाम्यावर अनुक्रमांक ०२ वर व जप्ती पंचनाम्यावर अनुक्रमांक ०१ चा पंच म्हणुन माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. (****साक्षीदाराने कथन केलेल्या स्वाक्षरींना अनुक्रमे निशाणी क्रमांक १३ व १४**** देण्यात येते).*

**०८.** *(साक्षीदारास प्रकरणातील अनुक्रमांक ०१ व ०२ कडील छायाचित्रे दाखविण्यात आलीत). अनुक्रमांक ०१ कडील छायाचित्राबाबत मला माहिती नाही. अनुक्रमांक ०२ कडील छायाचित्रात मी, पोलीस, पर्शुराम चोगले , पोलीस पाटील व*

*आमच्या गावातील एक व्यक्ती–बोरे असे आम्ही दिसत आहोत. (**केवळ अनुक्रमांक ०२ कडील छायाचित्रास ओळखीकरीता वस्तु – अ** देण्यात येते). (साक्षीदारास प्रकरणातील अनुक्रमांक ०३ ते ०६ कडील छायाचित्रे दाखविण्यात आलीत). अनुक्रमांक ०४ कडील छायाचित्रात मी, चंद्रकांत कामेरकर, पोलीस व आरोपी असे आम्ही दिसुन येत आहे. (**केवळ अनुक्रमांक ०४ कडील छायाचित्रास ओळखीकरीता वस्तु – ब** देण्यात येते). अनुक्रमांक ०३, ०५ व ०६ कडील छायाचित्रांबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी व आरोपी एकाच गावचे व एकाचवाडीचे येथील रहीवासी आहोत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्याकरीता आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.*

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांच्याकडून –**

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, देवरुख–मार्लेश्वर रस्त्यावरुन माझे नेहमी येणे जाणे असते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सदर रस्त्याची परीस्थीती व त्याच्या चतुःसिमेबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे माझ्या सर्व सहया देवरुख पोलीस ठाण्यात घेतल्या होत्या.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.31 11:55:54 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. ३०.१२.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date of decision | :- | 30/12/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 30/12/2025 |
| Evidence uploaded on | :- | 30/12/2025 |